कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २३/०९/२०१७

# ***मौजा खेडेगाव येथे भव्य जनजागरण मेळाव्याचे आयोजन***

पोलीस स्टेशन पुराडा हद्दीतील मौजा - खेडेगाव येथे गडचिरोली जिल्हा प्रशासना अंतर्गत पोस्टे पुराडा च्या वतीने शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती जनतेस मिळावी व जनतेत जनजागृती व्हावी या करीता मौजा खेडेगाव येथे भव्य जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर मेळाव्याकरीता मोठया प्रमाणात जनसमूदाय उपस्थित होता. मेळाव्यादरम्यान शासकिय विभागाचे स्टॉल लावून संबंधीत विभागाचे प्रमूख प्रतिनीधींनी कल्याणकारी योजनांची माहीती उपस्थित असलेल्या जनसमूदायास दिली.

सदर मेळावा श्री. सपोनि महाले, पोस्ट पुराडा यांचे अध्यक्षते खाली श्री. जीवनभाऊ नाट, माजी उपाध्यक्ष जि.प.गडचिरोली प्रमुख अतिथी म्हणून यांनी सरस्वती मातेच्या प्रतिमेला दिप प्रज्वलीत करुन उद्घाटन केले. त्यावेळी हेमतशहा सयाम सरपंच ग्रा.पं. खेडेगाव विश्वनाथजी मेश्राम म.गा.त.मु. गा अध्यक्ष खेडेगाव दूर्वासजी बनकर सदस्य ग्रामपंचायत खेडेगाव, परसरामजी नाट पोलीस पाटील खेडेगाव, श्री. आर. जी. राठोड तलाठी कार्यालय खेडेगाव, लोकचंदजी दरवडे उपसरपंच खेडेगाव, होमराज कवडो माजी उपसरपंच खेडेगाव, यशवंत पाटनकर माजी संरपंच ग्रामपंचायत खेडेगाव, तुकारामजी डोगरवार प्रतिष्ठीत नागरिक खेडेगाव असे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते.

सदर मेळाव्यादरम्यान विविध स्पर्धा, रेला नृत्याचे आयोजन करण्यात आले होते तसेच सामुहिक विवाह सोहळा ही पार पडला. मेळाव्या दरम्यान घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना व व्हालीबॉल स्पर्धेतील विजेत्यांना प्रशस्तीपत्र व ट्राफी, नेट व व्हॉलीबॉल प्रमुख अतिथीच्या हस्ते वाटप करण्यात आले. त्यानंतर मेळाव्यामध्ये उपस्थीत जनसमूदायाने भोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


गडचिरोली जिल्हा
पोलीस प्रशासन अंतर्गत



